# अमरावती महानगरपालिका अमरावती

कार्यालय :- महानगरपालिका अमरावती
जा. क्र. अमनपा/ पर्या /आयु/३८ /२०१८.
दिनांक :- ३०/८/१८

प्रति,

**मा. जिल्हाधिकारी ,**

**अमरावती.**

**विषय :- जनहित याचिका क्र. १७३/२०१० डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर ( मंडप / पेंडाल तपासणीबाबत,)**

**संदर्भ :-** १. श्री. कि. पां. वडते,उपसचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांचे पत्र क्र. संकिर्ण -२०१५५/प्र.क्र. १०/ म-६/ दि. २४ /०७/ २०१७.

२. आपले कार्यालयाचे पत्र क्र. अका / एमएजी /डे-२७ /कावी /२९४ /२०१८ दि. २६/०३/२०१८

**महोदय,**

विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र. १ चे परिपत्रक प्राप्त असून ध्वनी प्रदुषण नियम २००० अन्वये रस्त्यावर /पदपथावर/पदचारी मार्गावर तात्पुरत्या मंडप व तत्सम रचना उभारण्याच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाचे आदेशाची अंमलबजावणी करण्याकरीता मा. न्यायालयाचे आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रामध्ये मंडप तपासणी बाबतची कार्यवाही प्रभावीपणे होण्यासाठी जिल्हानिहाय मंडप तपासणी संनियंत्रण समिती /समित्या आपले कार्यालयाकडून गठीत करण्याबाबत निर्देश आहेत.

**मंडप तपासणी संनियंत्रण समितीची रचना खालीलप्रमाणे आहे.**

१. उपविभागीय अधिकारी - अध्यक्ष
२. सहाय्यक/उपआयुक्त महानगरपालिका -सदस्य
३. सहाय्यक पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक - सदस्य

सदर्हु आदेशाचे अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्राकरीता संनियंत्रण समिती गठीत करण्याकरीता महानगरपालिकेकडून अधिकारी यांचे नावे कळविण्यात येत असून खालील नमुद अधिकाऱ्यांचा मंडप तपासणी संनियंत्रण समितीमध्ये समावेश करण्यात यावा, हि विनंती.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम | संपर्क क्रमांक | वॉट्सअप क्रमांक | मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्री. प्रशांत शेळके | सहाय्यक आयुक्त झोन क्र. ४ | ९०२२४३८९७३ | ९०२२४३८९७३ | |

आयुक्त
**महानगरपालिका अमरावती**

**प्रतिलीपीः-**

१. श्री. कि. पां. वडते,उपसचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांचे माहिता
२. अप्पर जिल्हादंडाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे माहितीकरिता.

स्वा/-
आयुक्त
महानगरपालिका अमरावती

**ध्वनी प्रदुषण नियम २००० अन्वये सार्वजनिक उत्सव समारंभाकरीता .उभारण्यात येणाऱ्या मंडप / पेंडॉल तपासणी करीता मंडप तपासणी संनियंत्रण समिती गठित करण्याबाबत.**

# अमरावती महानगरपालिका अमरावती

**कार्यालय :-** महानगरपालिका अमरावती
जा. क्र. अमनपा/पर्या /आयु/ ३८ /२०१८.
दिनांक :- ३०/८/१८

## आदेश :-

**संदर्भ:-** १. शासन परीपत्रक क्र. न्यायाप्र २०१६/प्र.क्र. १२७/(भाग-१) नवि-१७ दि. ६ मार्च, २०१७.

२. उपसचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण -२०१५/प्र.क्र.१०/म-६ दि. २४/०७/२०१७

२. मा. जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र क्र. अका/एमएजी/डे-२७/कावी/२९४/२०१८ दि. २६/०३/२०१८

जनहित याचिका क्र. १७३/२०१० संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दि. २४ जून २०१५ व दि. १०,११,१२ व १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रांमध्ये सार्वजनिक सण /उत्सव /समारंभ यासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडप/पेंडॉल तपासणी बाबत मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत तहसिलदार अथवा त्यावरील अधिकाऱ्यांची मंडप/पेंडाल तपासणी समिती गठीत करण्याचे निर्देश प्राप्त आहे. मंडप तपासणी पथकामार्फत सार्वजनिक उत्सव/समारंभ सुरु होण्यापूर्वी **सात दिवस अगोदर** मंडप/पेंडॉल तपासणी करून यासंदर्भातील वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्यात यावा. विषयांकित प्रकरणी कार्यवाही करण्याकरीता उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेत तपासणी पथक गठीत करण्यात आले असून या पथकामध्ये आपली नेमणूक करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने प्राप्त संदर्भ क्र. २ चे पत्राची प्रत यास संलग्न आहे.

संबंधीत पथकामध्ये समावेश असलेले अधिकाऱ्यांसोबत आपण संपर्क साधून विषयांकित प्रकरणी कार्यवाही करून महानगरपालिका क्षेत्रातील संबंधीत समितीने आगामी **उत्सव सुरु होण्यापुर्वी ३ दिवस अगोदर** महानगरपालिकेस देणे क्रमप्राप्त आहे.

उक्त प्रकरणी कार्यवाही करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत सहाय्यक आयुक्त यांचे नियंत्रणात झोन निहाय तपासणी पथक गठीत करण्यात आले असून, मा. जिल्हाधिकारी यांचेमार्फत गठीत पथक व महानगरपालिकेचे पथक यांचेमध्ये समन्वय साधावा. तपासणी अहवाल सादर करत असतांना दोन्ही पथकांचे अहवालामध्ये विसंगती असू नये याकरीता सर्व झोनचे उपअभियंता यांचेकडून अहवाल मागणी करून व आकडेवारीची तपासणी करून अहवाल सादर करण्यात यावा.

आयुक्त
महानगरपालिका अमरावती.

**प्रति,**

**श्री. प्रशांत शेळके,**
**सहाय्यक आयुक्त, कक्ष प्रमुख,**
दक्षिण झोन क्र. ४, महानगरपालिका अमरावती.

**प्रतिलीपी:**

१. मा. जिल्हाधिकारी अमरावती यांचे माहितीकरीता सादर.
२. मा. पोलीस आयुक्त, अमरावती यांचे माहितीकरीता सादर. महानगरपालिका अमरावती.
३. उपायुक्त (प्र./सा.) महानगरपालिका अमरावती यांना माहितीकरीता.
४. उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे माहितीकरीता
५. सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन, अमरावती शहर अमरावती, यांचे माहितीकरीता.

स्वा/-
**आयुक्त**
**महानगरपालिका अमरावती**

**ध्वनी प्रदुषण नियम २००० अन्वये सार्वजनिक उत्सव समारंभाकरीता उभारण्यात येणाऱ्या मंडप / पेंडॉल तपासणी करीता मंडप तपासणी संनियंत्रण समिती गठित करण्याबाबत.**

# अमरावती महानगरपालिका अमरावती

**कार्यालय :-** महानगरपालिका अमरावती
जा. क्र. अमनपा/ पर्या /आयु/ 39 /२०१८.
दिनांक :- 30/6/18

## आदेश :-

**संदर्भ:- १.** शासन परीपत्रक क्र. न्यायाप्र २०१६/प्र.क्र. १२७/(भाग-१) नवि-१७ दि. ६ मार्च, २०१७.

२. उपसचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण -२०१५/प्र.क्र.१०/म-६ दि. २४/०७/२०१७

२. मा. जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र क्र. अका/एमएजी/डे-२७/कावी/२९४/२०१८ दि. २६/०३/२०१८

जनहित याचिका क्र. १७३/२०१० संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दि. २४ जून २०१५ व दि. १०,११,१२ व १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रांमध्ये सार्वजनिक सण /उत्सव /समारंभ यासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडप/पेंडॉल तपासणीबाबत जिल्हाधिकारी अमरावती यांचे मार्फत तहसिलदार अथवा त्यावरील अधिकाऱ्यांच्या गठीत करण्यात आलेल्या मंडप तपासणी पथकामार्फत सार्वजनिक उत्सव/समारंभ सुरु होण्यापूर्वी सात दिवस अगोदर मंडप/पेंडॉल तपासणी करून यासंदर्भातील वस्तुनिष्ठ अहवाल प्राप्त होण्यास्तव विषयांकित प्रकरणी कार्यवाही करण्याकरीता उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेत तपासणी पथक गठीत करण्यात आले आहे.

विषयांकित प्रकरणी महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्याकरीता आयोजकाकडून उभारण्यात आलेला मंडप/पेंडॉल किती प्रमाणात अनधिकृत आहे, यासारख्या तांत्रिक बाबींची शहानिशा होणे आवश्यक असल्याने सर्व झोन स्तरावर कार्यरत उपअभियंता यांचे नियंत्रणात कनिष्ठ / शाखा अभियंता व स्वास्थ निरीक्षक यांचे झोन निहाय तपासणी पथक गठीत करण्यात येत आहे. गठीत करण्यात पथकासंबंधीत माहिती सोबतचे विवरणानुसार पर्यावरण विभागास पाठविण्यात यावी. तसेच हि माहिती झोन कार्यालयाचे दर्शनी भागावर जनतेचे माहितीकरीता प्रसिध्द करावी. *सर्व उपअभियंता यांनी आदेशानुसार सण उत्सवाचे कालावधी पुर्वी तसेच कालावधी मध्ये उभारण्यात येणाऱ्या मंडप/पेंडॉल तपासणी प्रकरणी कार्यवाही करून याबाबतचा अहवाल* ***[ विवरणपत्र - अ व विवरणपत्र -ड ]*** *मध्ये सादर करण्यात यावा. मंडप उभारणी संदर्भात नागरीकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींची नोंद घेण्याकरीता झोन कार्यालयात स्वतंत्र्य नोंदवही ठेवण्यात यावी.*

तसेच ध्वनी प्रदुषण नियम २००० अन्वये मा. उच्च न्यायलयाचे प्राप्त निर्देशाचे अनुपालनास्तव सार्वजनिक उत्सव समारंभाचे कालावधीत नागरीकांकडून प्राप्त होणाऱ्या **ध्वनी प्रदुषणा संबंधीत तक्रारींची नोंद घेण्याकरीता झोन कार्यालयात स्वतंत्र्य नोंदवही ठेवण्यात यावी.** तसेच यासंबंधीत प्राप्त तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यात यावे व याबाबतची नोंद नोदवहित घेण्यात यावी.

मा. जिल्हाधिकारी यांचेमार्फत उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेत तपासणी पथक गठीत करण्यात आले असून या पथकामध्ये मध्ये महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त झोन क्र. ४ यांचा समावेश करण्यात

आला आहे. **ध्वनी प्रदुषण नियम २००० अन्वये सार्वजनिक उत्सव समारंभाकरीता उभारण्यात येणाऱ्या मंडप / पेंडॉल तपासणी करीता मंडप तपासणी संनियंत्रण समिती सदस्यांनी उत्सव सुरु होण्याचे तीन दिवसा पुर्वीपासून मंडप/ पेंडॉल उभारणी बाबत तपासणी करून अहवाल पर्यावरण विभागाकडे सादर करावा.**

तपासणी अहवाल सादर करत असतांना दोन्ही पथकांचे अहवालामध्ये विसंगती असू नये याकरीता मा. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत गठीत करण्यात आलेल्या पथकांमधील सदस्यांसोबत समन्वय साधून आपले सर्व झोनचे कार्यवाही संबंधीत अहवाल सोबतचे विवरणानुसार सादर करण्यात यावा.

**सहपत्र :- [ विवरणपत्र - अ व विवरणपत्र -ड]**

आयुक्त
महानगरपालिका अमरावती.

प्रत,

१. सहाय्यक आयुक्त,
२. उपअभियंता,
उत्तर,मध्य, पुर्व, दक्षिण, पश्चिम झोन,
झोन क्र. १,२,३,४ व ५ महानगरपालिका अमरावती.

प्रतिलीपीः

१. मा. जिल्हाधिकारी अमरावती यांचे माहितीकरीता सादर.
२. मा. पोलीस आयुक्त, अमरावती यांचे माहितीकरीता सादर.
३. उपायुक्त (प्र./सा.) महानगरपालिका अमरावती यांना माहितीकरीता.
४. उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे माहितीकरीता.
५. सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन, अमरावती शहर अमरावती, यांचे माहितीकरीता.
६. सहाय्यक आयुक्त, दक्षिण झोन, झोन क्र. ४ महानगरपालिका अमरावती, यांचे माहितीकरीता.

आयुक्त
महानगरपालिका अमरावती.

o/c

**सार्वजनिक उत्सव समारंभाकरीता उभारण्यात येणाऱ्या मंडप / पेंडॉल तपासणी तसेच ध्वनी प्रदुषण नियंत्रणकरीता समिती गठीत करणे बाबत.**

# अमरावती महानगरपालिका अमरावती

**कार्यालय :-** महानगरपालिका अमरावती
जा. क्र. अमनपा/ पर्या /आयु/ ४० /२०१८.
दिनांक :- ३०/८/१८

**आदेश :-**

**संदर्भ :-** १. शासन परीपत्रक क्र. न्यायाप्र २०१६/प्र.क्र. १२७/(भाग-१) नवि-१७ दि. ६ मार्च, २०१७.

२. उपसचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण -२०१५/प्र.क्र.१०/म-६ दि. २४/०७/२०१७

३. मा. जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र क्र. अका / एमएजी /डे-२७ /कावी /२९४ /२०१८ दि. २६/०३/२०१८

जनहित याचिका क्र. १७३/२०१० संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दि. २४ जून २०१५ व दि. १०,११,१२ व १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रांमध्ये सार्वजनिक सण /उत्सव /समारंभ यासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडप/पेंडॉल तपासणीबाबत तसेच ध्वनीप्रदुषण नियंत्रण संदर्भात आदेश निर्गमित केले आहे. सदर्हु आदेशाची काटेकोरपणे अंमलबाजवणी होणे आवश्यक आहे.

विषयांकीत प्रकरणी महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्याकरीता आयोजकाकडून उभारण्यात आलेला मंडप/पेंडॉल किती प्रमाणात अनधिकृत आहे यासारख्या तांत्रिक बाबींची शहानिशा करणेकरीता उपअभियंता झोन कार्यालयांचे पथक निर्माण करण्यात आले आहे. तसेच ध्वनी प्रदुषण नियम २००० ची अंमलबाजणी होण्याचे दृष्टीकोनातून झोननिहाय सहाय्यक आयुक्त यांचे नियंत्रणात व उपअभियंता यांचे अध्यक्षतेत, सहाय्यक अभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक, स्वास्थ निरिक्षक यांची ध्वनी प्रदुषण तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सर्व झोन स्तरावर कार्यरत उपअभियंता यांचे नियंत्रणात कनिष्ठ / शाखा अभियंता व स्वास्थ निरीक्षक यांचे झोन निहाय तपासणी पथक गठीत करण्यात आलेले पथकामार्फत झोननिहाय दहीहांडी, गणेशत्सव,दुर्गोत्सव, इतर धार्मीक/सामाजिक उत्सव २०१८ करीता उभारण्यात येणाऱ्या मंडप / पेंडॉलची तपासणी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा.

उभारण्यात मंडप / पेंडॉल परवानगी आहे किंवा कसे, मंडपाची रस्त्यावरील टक्केवारी किती आहे तसेच प्रत्येक मंडपाचे, रस्त्यावर, खाजगी जागेत, सार्वजनीक जागेत याची तपासणी करावी. मंडळास प्राप्त परवानगी प्रत मंडळाचे दर्शनी भागात लावणे अनिवार्य आहे. मा. उच्च न्यायालयाचे निर्देशाचे पालन होण्यास्तव तसेच महाराष्ट्र शासनांकडून पर्यावरण संबंधीत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले अधिसुचनेच्या अंमलबजावणी करीता परवानगी पत्राच्या अटी / शर्तीमध्ये त्याचा समावेश करण्यात आला असून सुधारीत ना-हरकत / परवानगीपत्राचा मसुदा संलग्न करण्यात आला असून त्यानुसारच परवानगी निर्गमित करण्यात यावी. तसेच या संदर्भात मंडळाचे आयोजकास सुचित करावे. ध्वनीप्रदुषणाचे मानकानुसार ध्वनी पक्षेपक वाजविण्याची आवजाची अनुज्ञेय तिव्रता दर्शविणारे फलक मंडळाचे दर्शनी भागात लावणे अनिवार्य आहेत. यानुसार मंडळाचे आयोजकास सोबतचे विवरणानुसार ध्वनीप्रदुषण मानकांचा फलक मंडळाचे दर्शनी भागी लावण्यास सुचित करावे.

20

पथकामार्फत ध्वनीप्रदुषण नियम २००० व मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचे अनुषंगाने मंडप तपासणी व ध्वनीप्रदुषण संदर्भात कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी सादर करावा. जेणेकरून मां. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार शासनास वेळोवेळी व तातडीने आवश्यक माहिती / अहवाल सादर करणे सोईचे होईल.

उपरोक्त कार्यवाहीत कोणतीही हयगय होणार नाही याची दक्षता घ्यावी. उक्त आदेश तात्काळ अंमलात येतील.

आयुक्त
महानगरपालिका अमरावती.

प्रत,

**१.सहाय्यक आयुक्त,**
**२.अभियंता,**
**३. उपअभियंता**
**४. जेष्ठ स्वास्थ निरीक्षक**
**५. स्वास्थ निरीक्षक**
उत्तर, मध्य, पुर्व, दक्षिण, पश्चिम झोन,
झोन क्र. १,२,३,४ व ५, महानगरपालिका अमरावती.

**प्रतिलीपीः**

१. मा. जिल्हाधिकारी अमरावती यांचे माहितीकरीता सादर.
२. मा. पोलीस आयुक्त, अमरावती यांचे माहितीकरीता सादर.
३. उपायुक्त (प्र./सा.) महानगरपालिका अमरावती यांना माहितीकरीता.
४. उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे माहितीकरीता
५. सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन, अमरावती शहर अमरावती, यांचे माहितीकरीता.
६. अतिक्रमण पथक प्रमुख, महानगरपालिका अमरावती, यांचे माहितीकरीता.

स्वा/-
आयुक्त
महानगरपालिका अमरावती

रस्त्यावरील / पादचारी मार्गावरील अनधिकृत मंडप/ कक्ष तसेच ध्वनी प्रदुषण संबंधीत भरारी पथक गठीत करणेबाबत.

# अमरावती महानगरपालिका अमरावती

कार्यालय :- महानगरपालिका अमरावती
जा. क्र. अमनपा/ पर्या /आयु/८१ /२०१८.
दिनांक :- ३०/०८/१८

## आदेश :-

जनहित याचिका क्र. १७३/२०१० डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर प्रकरणी मा. उच्च न्ययायालयाचे आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रांअतर्गत साजरे होणारे उत्सवाकरीता महानगरपालिकेने झोन स्तरावर मंडप / पेंडॉल/ कक्ष उभारणीकरीता सशर्त परवानगी दिली जाते. त्याअनुषंगाने अर्जदाराकडून परवानगीमध्ये नमुद अटी व शर्तीचे पालन होणे आवश्यक आहे..

अमरावती महानगरपालिका क्षेत्रांअतर्गत सण उत्सवा दरम्यान उभारण्यात येणारे मंडप/पेंडॉल/कक्ष तपासणी करण्याकरीता तसेच ध्वनी प्रदुषणाबाबत नागरीकांना तक्रार दाखल करण्याचे सुविधेकरीता झोन स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे..

वर नमुद तक्रार निवारण कक्षाकडील प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने तपासणी करणे, परवानगीतील अटी / शर्तीनुसार मंडपाची उभारणी केली असलेबाबत शहानिशा करणे व अनुषंगीक अहवाल सादर करणेकरीता स्वास्थ अधिक्षक व झोनचे प्रमुख स्वास्थ निरीक्षक यांचे पुढीलप्रमाणे भरारी पथक गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी यांचे नाव | पद नाम |
|---|---|---|
| १ | श्री. अरुण तिजारे, स्वास्थ अधिक्षक (मुख्यालय) | पथक प्रमुख |
| २ | श्री. धनंजय शिंदे, जेष्ठ स्वास्थ निरिक्षक झोन क्र.१ | सदस्य |
| ३ | श्री. सिध्दार्थ गेडाम, जेष्ठ स्वास्थ निरिक्षक झोन क्र.२ | सदस्य |
| ४ | श्री. एस.एस. पळसकर, जेष्ठ स्वास्थ निरिक्षक झोन क्र.३ | सदस्य |
| ५ | श्री. ए.आर. कुलकर्णी, जेष्ठ स्वास्थ निरिक्षक झोन क्र.४ | सदस्य |
| ६ | श्री. आय. आर खान, जेष्ठ स्वास्थ निरिक्षक झोन क्र. ५ | सदस्य |

आयुक्त
महानगरपालिकाअमरावती.

प्रति,

१. श्री. अरुण तिजारे, स्वास्थ अधिक्षक (मुख्यालय)
२. श्री. धनंजय शिंदे, जेष्ठ स्वास्थ निरिक्षक झोन क्र.१
३. श्री. सिध्दार्थ गेडाम, जेष्ठ स्वास्थ निरिक्षक झोन क्र.२
४. श्री. एस.एस. पळसकर, जेष्ठ स्वास्थ निरिक्षक झोन क्र.३
५. श्री. ए.आर. कुलकर्णी, जेष्ठ स्वास्थ निरिक्षक झोन क्र.४
६. श्री. आय. आर खान, जेष्ठ स्वास्थ निरिक्षक झोन क्र. ५

प्रतिलीपी :-

१. उपायुक्त (प्रशा. / सा.), महानगरपालिका अमरावती यांचे माहितीकरीता.
२. सहाय्यक आयुक्त, झोन क्र. १,२,३,४ व ५, महानगरपालिका अमरावती यांचे माहितीकरीता.
३. वैद्यकीय अरोग्य अधिकारी, महानगरपालिका अमरावती यांचे माहितीकरीता.
४. जनसंपर्क अधिकारी, महानगरपालिका अमरावती यांचे माहितीकरीता.

स्वा/-
आयुक्त
महानगरपालिकाअमरावती.